नाशिक महानगरपालिका, नाशिक.
Rajeev Gandhi Bhavan, Sharanpur Road, (Post Box no.12), Nashik-422 002.
Visit us at : www.nmc.gov.in E-mail: dmc_lic@nmc.gov.in ph.no. 0253-2222476

जा. क्र.जापवि/कक्ष-१/३५८ /२०२०
दिनांक :०२ /०६ /२०२०
NMC/DTD/OWL/२०२०/

**विषय:-** राज्यात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्प्याटप्प्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.)

**संदर्भ :-**१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०,३३, ३४, ४१ व कलम ५१.
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक:करोना २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५. दि.१३/०३/२०२०, दि.१४/०३/२०२०.
३. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र यांचे कडील महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन अधिसूचना क्रमांक डीआयएसएम-१ दि.३१/०५/२०२०
४. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र यांचे कडील महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन अधिसूचना क्रमांक डीएमयु/२०२०/सीआर/९२/डीआयएसएम-१ दि.०५ मे, २०२०
५.मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक यांचेकडील - क्र. कक्ष/कोरोना विषाणू/३०२/२०२० दि.०२/०६/२०२०

---

**आदेश**

शासनाने कोरोना विषाणुचा (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा,१८९७ दिनांक १३ मार्च,२०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेनुसार प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय क्र.३ मधील दि.३१/०५/२०२० रोजीच्या आदेशान्वये **मिशन बिगीन अगेन** अंतर्गत साथरोग प्रतिबंधात्मक कायदा,१८९७ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५ अन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत निर्बंध सुकर करणे तसेच टप्प्याटप्प्याने टाळेबंदी उघडणेबाबत (Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.) निर्देश दिलेले असून. लॉकडाऊन (Lockdown) चे आदेशास दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. तसेच, यापूर्वी शासनाने निर्गमित केलेले विविध आदेश संदर्भ क्र.३ च्या आदेशा बरोबर दि.३०/०६/२०२० पर्यंत संरेखित करण्यात आल्याचे कळविले आहे.

संदर्भिय क्र. ३. मधील दि.३१/०५/२०२० चे आदेशात **मिशन बिगिन अगेन फेज I** मध्ये निर्देशित केलेप्रमाणे, कोरोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दि.३ जून,२०२० पासून जॉगींग ट्रॅक व उद्याने नागरिकांसाठी काही अटीवर खुल्या करण्यासाठी परवानगी दिलेली असल्याने नाशिक शहरातील उद्याने व जॉगींग ट्रॅक खालील अटीवर खुल्या करण्यात येत आहे.

१. ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, गर्भवती महिला, १० वर्षाखालील बालक,गंभीर आजार असलेल्या व्यक्ती यांनी उद्याने व जॉगींग ट्रॅकचे ठिकाणी येण्याचे टाळावे.
२. उद्याने व जॉगींग ट्रॅकच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक नागरिकांने चेहयावर मास्क लावणे बंधनकारक राहील. तसेच उद्याने व जॉगींग ट्रॅकचे आवारात थुंकण्यास बंदी राहील.तथापी या अटीचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.
३. जॉगींग ट्रॅक व उद्यानाचे ठिकाणी सामाजिक, सांस्कृतिक, मनोरंजनाचे, शैक्षणिक कार्यक्रम तसेच क्रिडा स्पर्धा घेण्यास बंदी असेल.
४. उद्याने व जॉगींग ट्रॅक सकाळी ५.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत सुरु राहतील.
५. नागरिकांना त्यांचे जवळील उद्याने व जॉगींग ट्रॅक यांचा वापर करावा. दुर वरील अथवा इतर ठिकाणी असलेल्या जॉगीग ट्रॅक व उद्यानाचा वापर टाळावा.
६. नागरीकांनी उद्याने व जॉगींग ट्रॅकचे ठिकाणी सामाजिक अंतर ठेवुन वापर करावा.गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

संदर्भिय क्र. ३. मधील दि.३१/०५/२०२० चे आदेशात **मिशन बिगिन अगेन फेज II** मध्ये निर्देशित केलेप्रमाणे, कोरोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दि.५ जून,२०२० पासून साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार आणि नाशिक महानगरपालिका क्षेत्रात लागू झालेली संचारबंदी विचारात घेऊन, संदर्भ क्र.४ अन्वये शहरातील दुकाने/ बाजारपेठ यांचे वेळ निश्चितीबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना प्राप्त अधिकारानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकाच ठिकाणी गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने जीवनावश्यक वस्तू तसेच सर्व बाजारपेठा, बाजारपेठ परीसर आणि दुकाने यांना खालीलप्रमाणे अटी-शर्तीवर परवानगी देण्यांत येत आहे.

Scanned by CamScanner

१. शहरातील सर्व बाजारपेठा, बाजारपेठ परीसर आणि दुकाने (मॉल आणि व्यापारी संकुल वगळून), शहर वाहतूक शाखेने P-1 आणि P-2 बाबत प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार रस्त्याला/ पॅसेजला/ लेनला सम तारखांना (जसे दि.२,४,६,८,१०....) व त्या समोरील बाजूस असणारी दुकाने विषम तारखांना (जसे दि.१,३,५,७,९...) सकाळी ९.०० ते ५.०० वाजेपर्यंत उघडी ठेवता येतील. तसेच, ज्या बाजारपेठा, बाजारपेठ परीसर आणि दुकाने यांचा समावेश शहर वाहतूक शाखेने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेत नसेल, अशा ठिकाणी संबंधित विभागीय अधिकारी यांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करुन सम विषम ( P-1 आणि P-2 ) बाबत विभागीय स्तरावर निर्णय घेणेत यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करणेत यावा.

२. आठवडे बाजारांमध्ये एकाच ठिकाणी मोठया प्रमाणावर गर्दी होऊ नये यासाठी ज्याप्रमाणे त्यांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक त्या ठिकाणी नमूद भाजी पाला व फळे विक्री ठिकाणी नियमानुसार विक्री करतांना व सेवा देतांना अनावश्यक गर्दी होणार नाही व दोन व्यक्तींमध्ये (विक्रेता-ग्राहक व ग्राहक - ग्राहक) यांच्यात सुरक्षित किमान १ मीटर अंतर व दोन दुकांनामधील अंतर ५ मीटर ठेवणे बंधनकारक असून, संबंधित ठिकाणी सामाजिक अंतराचे (Physical Distance) पालन करुन मनपा अटी-शर्तीनुसार **भाजी/फळे बाजार तसेच अधिकृत मटन / चिकन व अंडी विक्री दुकाने, किराणा, पीठाची गिरणी व इतर जीवनावश्यक वस्तू विक्रीची दुकाने (औषण विक्री दुकाने वगळून) सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.**

३. कपडयांच्या दुकांनामधील Trial Room तसेच अशाच प्रकारचा वापर असणाऱ्या इतर अपेरल्स, यांना जंतु संसर्ग रोखण्याच्या अनुषंगाने परवानगी दिली जाणार नाही.

४. दुकांनामध्ये सामाजिक अंतराचे पालन करण्यासंदर्भात सर्वस्वी जबाबदारी दुकानदाराची राहील. दुकानदारांनी सामाजिक अंतराचे चिन्ह, टोकन पध्दत तसेच होम डिलीव्हरीला प्रोत्साहन दयावे.

५. लोकांनी खरेदीसाठी जातांना पायी/ सायकलचा वापर करावा. शक्यतो आपल्या परिसराच्या जवळ असणाऱ्या बाजारातूनच खरेदी करावी. अनावश्यक वस्तुंच्या खरेदीसाठी दूरच्या बाजारात जाण्यास परवानगी दिली जाणार नाही. खरेदी करण्यासाठी वाहनाचा वापर करु नये.

६. प्रत्येक दुकानदाराने तोंडाला मास्क व हातामध्ये हॅन्डग्लोज वापरावेत.

७. सामाजिक अंतराचे उल्लंघन केल्याचे निदर्शणास आल्यास संबंधित बाजार/ दुकाने त्वरीत बंद करण्यात येतील.

८. प्रत्येक ठिकाणी दैनंदीन स्वच्छता / निर्जुतुकीकरणची व्यवस्था करणेत यावी.

**सदरच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही शहरातील ज्या भागात कन्टेनमेन्ट झोन जाहिर झालेले आहेत. तसेच, शहरातील यापुढे नव्याने जाहीर होणाऱ्या कन्टेनमेन्ट झोन भागात सदरचा आदेश लागू होणार नाही.**

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची व त्यास व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेची जबाबदारी सर्व संबंधितांची जवाबदारी राहील. आदेशाचे उल्लंघन करणारे भाजी-फळविक्रेते –दुकान, संस्था किंवा व्यक्ती कठोर कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश मनपा संकेतस्थळ www.nmc.gov.in वर प्रसिध्द करणेत आलेला आहे.

02-06-2020

(राधाकृष्ण गमे)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत माहितीसाठी / उंचित कार्यवाहीस्तव :**

अ) जिल्हाधिकारी,नाशिक तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नाशिक
आ) पोलीस आयुक्त,नाशिक शहर
इ) मा. महापौर, मा. उपमहापौर, नाशिक महानगरपालिका,नाशिक
ई) मा. सभागृह नेता / मा. विरोधी पक्षनेता / मा. सर्व पक्षीय गटनेते , नाशिक महानगरपालिका, नाशिक
उ) मा. सभापती, (सर्व समित्यांचे ) नाशिक महानगरपालिका,नाशिक

प्रत कार्यवाहीसाठी :

१. सर्व विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक
२. दसुरक्षा अधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक
३. सर्व विभागप्रमुख, नाशिक महानगरपालिका, नाशिक
४. जनसंपर्क अधिकारी, नाशिक महानगरपालिका , नाशिक

Scanned by CamScanner